## निवडक

### केरी बाहेरीलवाडा येथे शंकरानाथ स्वामींची आज पुण्यतिथी

■ टीम दैनिक हेराल्ड


॥ श्री सदगुरु शंकरनाथ स्वामी प्रसन्न ॥

**केरी, दि. २२ :** बाहेरीलवाडा केरी-सत्तरी येथील श्री सदगुरू शंकरानाथ मठात रविवार दि.२३ मार्च रोजी शंकरानाथ स्वामींची ६५ वी पुण्यतिथी साजरी करण्यात येणार आहे.यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सकाळपासून पाद्यपूजा, अभिषेक,नामस्मरण, आरती आदी कार्यक्रम होणार असून सकाळी ९.३० वाजल्यापासून समाधीला सिधा अर्पण करण्यात येईल. ११ वाजता संप्रदायिक नामस्मरण, दुपारी १२.३० वाजता पावणी व २.३० वाजता महाआरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी ६ वाजता गोव्यातील नामवंत गायक कलाकारांचा भक्तीधारा कार्यक्रम होणार आहे. यात गुरूदास गावकर व श्रेया देवधर यांचे गायन होणार आहे. त्यांना हार्मोनियमवर अमोल गावस, तबल्यावर सुनील म्हाउसकर, पखवाजवर विराज गावस, टाळ सिद्धेश गावस, संगीतसाथ करणार आहेत.तर कार्यक्रमाचे निवेदन गुरुदास सुतार करणार आहेत. या कार्यक्रमानंतर रात्री ९ वाजता मामा मोचे माडकर दशावतारी नाट्य कंपनीतर्फे नाट्यप्रयोग होणार आहे.असे मठाधीश व श्रीमद सद्गुरुरू शंकरनाथाश्रम मठ विश्वस्थ मंडळ बाहेरीलवाडा तर्फे कळविण्यात आले आहे.

---

### गजांतलक्ष्मी देवस्थानाच्या शिमगोत्सवाने प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. २२ :** वळवई येथील प्रसिद्ध श्री गजांतलक्ष्मी देवस्थानचा शिमगोत्सव उद्या शनिवार दि. २२ ते मंगळवार दि. २५ मार्चपर्यंत विविध कार्यक्रमांनीं साजरा केला जाणार आहे.या उत्सवातील मुख्य कार्यक्रम हा गोंधळोत्सव असून तो मंगळवारी २५ रोजी होणार आहे. शनिवारी २२ रोजी रात्री साडेदहा वाजता 'काहीतरी होतंय मला' हा नाट्यप्रयोग होईल. रविवारी २३ रोजी रात्री साडेदहा वाजता 'स्वराज्य सूर्य' हा नाट्यप्रयोग, सोमवारी दि. २४ रोजी 'राम जन्मला ग सखे' हा नाट्यप्रयोग होणार आहे. मंगळवारी गोंधळोत्सवात 'व्यंकोजी वाघ' हा नाट्यप्रयोग सादर केला जाणार आहे.

---

### व्होळावणे - थिवी येथे गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळची आज आमसभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २२ :** गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळ बार्देश तालुका शाखेची कार्यकारणी समितीची वार्षिक आमसभा रविवार दि. २३ रोजी दुपारी ३.३० वाजता व्होळावणे दिली. बार्देश येथील बाबू कोकरे यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आली आहे. या आमसभेत मागील सभेतील अहवाल वाचून कायम करणे, संघटनात्मक व कार्यात्मक अहवाल सभेपुढे ठेवणे, आतापर्यंत झालेला जमा-खर्च सभेपुढे ठेवणे व झालेल्या खर्चास मंजुरी देणे, बार्देश तालुक्याची २०२५ ते २०२८ सालासाठी नवीन समिती निवडणे तसेच अध्यक्षाच्या परवानगीने ऐनवेळी आलेल्या विषयावर चर्चा करणे आधी विषय चर्चिले जाणार आहेत, असे गोमंतक धनगर समाजोन्नती मंडळ-बार्देश शाखेचे अध्यक्ष विनायक खरात व सचिव मधू वरक यांनी प्रसिद्ध केले आहे.

---

### मोरजाई देवस्थान समितीच्या अध्यक्षपदासाठी आज निवडणूक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २२ :** मोरजी ग्रामदेवता श्रीदेवी मोरजाई देवस्थान महाजनांची विशेष सभा रविवार दि. २३ रोजी सकाळी १० वाजता श्रीदेवी मोरजाई मंदिर प्रांगणात आयोजित करण्यात आली आहे. या सभेमध्ये देवस्थान समितीचे नवीन अध्यक्ष निवडण्यासंबंधी प्रक्रिया मामलेदार यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. या सभेला मोठ्या संख्येने महाजनानी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मागच्या वेळी जी सभा आयोजित करून समिती निवडण्यात आली होती. ती समिती मामलेदार कार्यालयातून बात केल्यामुळे पुन्हा नवीन समितीचे अध्यक्ष निवड करण्यासाठी ही महत्त्वाची सभा रविवारी आयोजित होत आहे.

---

### गणेश मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी आज सभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २२ :** शिवोली येथील श्री गणेश मल्टीपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीची सातवी सर्वसाधारण सभा रविवारी दि. २३ रोजी संध्याकाळी चार वाजता होणार आहे तरी या बैठकीला सर्व भागधारकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या सर्वसाधारण सभेमध्ये ऑडिट रिपोर्ट, अंदाजपत्र तसेच सोसायटीला मल्टीपर्पज प्रायमरी एग्रीकल्चर कॉपरेट सोसायटीचा दर्जा देण्याबाबत चर्चा होणार आहे तरी सर्व भागधारकांनी तसेच ग्राहकांनी उपस्थित राहावे, आवाहन चेअरमन दयानंद मांद्रैकर यांनी केले आहे.

---

### मोरजीत आज 'वारणेचा वाघ' नाट्यप्रयोग

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २२ :** श्री दाडोबा प्रासादिक नाट्यमंडळ मरडीवाडा- मोरजीतर्फे रविवार दि. २३ रोजी, रात्री १० वाजता कौटुंबिक जिव्हाळ्याचे हृदयस्पर्शी संगीत सामाजिक दोन अंकी नाटक. वारणेचा वाघ नाटकाचा प्रयोग श्री मोरजाई मंदिर रंगमंचावर आयोजित करण्यात आला आहे. लेखक - हरिश्चंद्र पाटील, सूत्रधार - शंकर शेटगावकर, तबला - अजित शेटगावकर, दिग्दर्शक - हरीश शेटगावकर, नेपथ्य - भास्कर शेटगावकर, ऑर्गन साथ - राजू बर्वे, रंगभूषा, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत आणि ध्वनी संकलन किरण कला, मये - हे तांत्रिक बाजू सांभाळतील. यात कलाकार - समीर शेटगावकर. एच. एन. शेटगावकर, विठू सावंत. विशाल शेटगावकर. किशोर महादळेकर, साईनाथ महादळेकर, साहिल शेटगावकर, कृष्णा सावंत शोभा मांजरेकर, वामन शेटगावकर. काशिनाथ उर्फ आबा शेटगावकर भूमिका सादर. करणार. सर्व नाट्य रसिकांस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.

---

### अल्केमिस्ट आणि अमन गुप्ता यांच्याविरुद्ध २४ रोजी निषेध मोर्चा

टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. २२ : आगोंद येथील पर्यटन व्यवसाय व अन्य संबंधित लोकांना प्रचंड त्रास देणाऱ्या अन्याय्य कृत्यांना विरोध व पीडितांसोबत एकता दर्शविण्यासाठी सोमवार दि. २४ मार्च, रोजी सकाळी १० वाजता शांततापूर्ण निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा निषेध मोर्चा सरकार किंवा त्यांच्या एजन्सींविरुद्ध नसल्याचे काणकोण शेक ऑनरस् संघटनेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. आपला लढा अल्केमिस्ट आणि श्री. अमन गुप्ता यांच्याविरुद्ध आहे, ज्यांच्या कृतींमुळे झोपड्या आणि इतर आस्थापने दि.२० पासून सील करण्यात आली आहेत. ज्यामुळे स्थानिक समुदायाला त्रास सहन करावा लागला त्या विरुद्ध असल्याचे म्हटले आहे. अमन गुप्ता यांचा खरा चेहरा उघड करण्याची आणि त्यांची कृत्ये प्रकाशात आणण्याकरता सर्व काणकोकरांना सकाळी १० वाजता काणकोणच्या कदंब बस स्टँडवर मोठ्या संख्येने एकत्र येऊन काणकोण उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ज्यामध्ये श्री. अमन गुप्ता आणि त्यांच्या टीमने केलेल्या अत्याचारांवर प्रकाश टाकला जाईल. एकता, ताकद आणि दृढनिश्चय दाखवण्याचा हा क्षण आहे. आपण ठामपणे उभे राहूया आणि हे जाहीर करूया की आपल्याला गप्प बसवले जाणार नाही. एकत्रितपणे, आपण आगोंदा आणि तेथील लोकांना न्यायाची मागणी करत असल्याचे तसेच या मोर्चात सामील होऊन आणि बुलंद आवाज महत्वाचा बनवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'आयपीएल २०२५'चे शानदार उद्घाटन

## अनेक कलाकारांच्या उपस्थितीने उद्घाटनाची शोभा वाढवली : विराट कोहली शहारुखच्या गाण्यावर थिरकला




**कोलकाता, दि. २२ :**

आयपीएलच्या १२ व्या हंगामाला शनिवारपासून सुरुवात झाली. ईडन गार्डन्सवर ओपनिंग सेरेमनी झाली. अनेक कलाकारांनी आपल्या परफॉर्मन्सने ओपनिंग सेरेमनीची शोभा वाढवली. विराट कोहलीच्या शाहरूख खानबरोबर डान्सने महफिल लुटली.

आयपीएल २०२५ ची ओपनिंग सेरेमनी ईडन गार्डन्सवर पार पडली. या ओपनिंग सेरेमनीची सुरुवात शाहरूख खानने केली. शाहरूख खान हा केकेआर संघाचा सहमालक आहे. शाहरूख खानच्या भाषणानंतर कार्यक्रम सुरू झाले. यामध्ये गायिका श्रेया घोषाल, बॉलीवूड अभिनेत्री दिशा पाटनी आणि रॅपर-गायक करन औलुजा यांनी वेगवेगळे परफॉर्मन्स सादर केले.

वरील कलाकारांच्या परफॉर्मन्सनंतर शाहरूख खान पुन्हा एकदा स्टेजवर आला. यानंतर शाहरूख खानने आयपीएलचा १८ वा सीझन पूर्ण झाला याबद्दल सांगितले. यानंतर विराट कोहलीला स्टेजवर बोलावलं. विराट कोहली हा आतापर्यंतच्या आयपीएलच्या सर्व १८ सीझनमध्ये खेळणारा खेळाडू आहे. तर या १८ वर्षात तो फक्त एकाच संघाकडून म्हणजेच आरसीबीकडून खेळला आहे, ही कामगिरी करणारा विराट एकमेव खेळाडू आहे. यासह विराट कोहली हा वरिष्ठ खेळाडू आहे तर केकेआरचा रिंकू सिंग हा नव्या दमाचा खेळाडू आहे.

शाहरूख खानने विराट कोहली आणि रिंकू सिंग यांना स्टेजवर बोलावलं आणि गप्पा मारल्या. विराट कोहली स्टेजवर येताच चाहत्यांनी एकच कल्ला केला. चाहत्यांबरोबर शाहरूखने देखील कोहली कोहलीचे नारे लावले. यानंतर रिंकू सिंगने शाहरूख खानबरोबर लुट पुट गया' या गाण्यावर डान्स केला. तर नंतर शाहरूखने विराटला त्याच्या पठाण या चित्रपटातील झुमे जो पठाण या गाण्यावर डान्स करायला लावलं. विराटनेही त्याच्या या गाण्याची हुक स्टेप करत शाहरूखबरोबर डान्स केला.

यानंतर शाहरूख खानने बीसीसीआयच्या सर्व पदाधिकाऱ्यांना स्टेजवर बोलावलं. यामध्ये बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी, सचिव देवजीत सैकिया, उपाध्यक्ष राजीव शुक्ला, आयपीएलचे चेयरमन अरूण धुमाळ, खजिनदार प्रभतेज भाटिया यांचा समावेश होता. यानंतर आयपीएलमध्ये सातत्याने १८ सीझन खेळल्याबद्दल विराटला आयपीएल १८ चा मोमेंटो देण्यात आला. त्यानंतर आयपीएलला १८ वर्ष झाल्याने केक कापण्यात आला. त्यानंतर कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर यांच्यात सलामीचा सामना खेळविण्यात आला.





केरी - फोंडा : प्रयोगशाळेच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित डॉ. अनिल देसाई, डॉ. शैला देसाई, संजय प्रियोळकर, सतीश कारेकर, जगन्नाथ केरकर, उषा नाईक, सिताराम गावडे व इतर.

# केसरबाई केरकर विद्यालयाच्या संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. २२ :** केरी - फोंडा येथील सुरश्री केसरबाई केरकर विद्यालयात नुतणीकृत संगणक प्रयोगशाळेचे डॉ. अनिल देसाई यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल देसाई उपस्थित होते. त्यांच्या पत्नी डॉ. शैला देसाई उपस्थित होत्या. सेन्ट्रो एदुकादोर संस्थेचे अध्यक्ष संजय प्रियोळकर, सचिव सतीश कारेकर, शाळेचे व्यवस्थापक जगन्नाथ केरकर, मुख्याध्यापिका उषा नाईक, पालक - शिक्षक संघाचे अध्यक्ष सिताराम गावडे, डॉ. अनिल देसाई यांचे गुरू दत्तात्रय उपाध्ये व रातोडकर गुरुजी, शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सेन्ट्रो एदुकादोर संस्थेचे इतर सदस्य, हितचिंतक, विद्यार्थी व पालकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

सर्वप्रथम मुख्याध्यापिका उषा नाईक यांनी उपस्थितांचे स्वागत केले व शिक्षिका शोभा प्रियोळकर यांनी परिचय करुन दिला. सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने सोहळ्यास सुरुवात झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्मृती फलकाचे विमोचन झाले आणि फीत कापून प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. अनिल देसाई यांनी शाळेतील आपल्या आठवणी प्रकट केल्या. परोपकाराचे बाळकडू त्यांच्या वडिलांकडून व शिक्षकांकडून मिळाले. आपण ज्या मातीत जन्माला आलो त्या मातीचे ऋण आपण फेडावे, असे ते म्हणाले.

डॉ. अनिल देसाई यांनी प्रयोगशाळेसाठी दहा संगणक आणि टेबल्स, एक स्मार्टबोर्ड, दोन लेपटोप, ऑनलाईन यु. पी. एस. दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका प्राविरा साखरदांडे यांनी केले व आभार प्रदर्शन शिक्षिका मुग्धा जाण यांनी केले.

# हरमल येथे २५ रोजी 'गोमंतकीय लोकनाट्य महोत्सव'

▶ढोलक भजन, जागोर व रणमाले पाहण्याची संधी

■ टीम दैनिक हेराल्ड




हरमल : गोमंतकीय लोकनाट्य महोत्सवाची माहिती देताना प्राचार्य डॉ पांडुरंग पंडित. सोबत संयोजक प्रा. डॉ. दुर्गेश मजिक व प्रा. कविता नायर.

**हरमल, दि. २२ :** हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळ संचलित गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि कला आणि संस्कृती संचालनालय, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २५ मार्च रोजी सकाळी १० वाजता हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या ज्ञानदा सभागृहात गोमंतकीय लोकनाट्य महोत्सवाचे आयोजन केले आहे.

या पत्रकार परिषदेला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडीत, महोत्सवाचे संयोजक डॉ. दुर्गेश माजिक तसेच आयक्यूएसी प्रमुख कविता नायर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला कला आणि संस्कृती संचालनालयाचे संचालक श्री. सगुण वेळीप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत,तर संस्थेचे चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर अध्यक्षस्थानी असणार आहे.

गोमंतकीय लोकनाट्य महोत्सवाची सुरूवात श्री रवळनाथ सांस्कृतिक कला मंडळ,पालये यांच्या ढोलक भजनाने होणार आहे. त्यानंतर पहिल्या सत्रात सकाळी ११ वाजता डॉ. हेमंत अय्या (सहाय्यक प्राध्यापक, मराठी अध्ययनशाखा, ङ्ग्रङ्कङ्ग गोवा विद्यापीठ) 'गोमंतकीय लोकनाट्य कालो (दशावतार)' या विषयावर प्रपत्र वाचन करणार आहेत, आणि त्या नंतर लोकनाट्य कालो (दशावतार) याचे सादरीकरण माही नाट्य मंडळ मोर्ले सत्तरी गोवा सादर करणार आहेत.

या महोत्सवाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. साईश देशपांडे (नाट्य दिग्दर्शक, रंगसंगीतकार आणि अभ्यासक) 'गोमंतकीय लोकनाट्य जागोर' या विषयावर निबंध वाचन करणार आहेत, तर गोपालकृष्ण कलासंगम, प्रियोळ, फोंडा, 'जागोर' हे लोकनाट्य सादर करणार आहेत.


व तिसऱ्या सत्रात डॉ. दुर्गेश माजिक (सहाय्यक प्राध्यापक, गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय) 'गोमंतकीय लोकनाट्य रणमाले' या विषयावर प्रपत्र वाचन करणार आहेत आणि नंतर श्री. सातेरी केळबाय रणमाले पथक झर्मे, सत्तरी लोकनाट्य रणमालेचे सादरीकरण करणार आहेत.

या गोमंतकीय लोकनाट्य महोत्सवाच्या समारोप सोहळ्यास कला आणि संस्कृती संचालनालयाचे उपसंचालक मिलींद माटे प्रमुख पाहुणे व अध्यक्षस्थानी चेअरमन लक्ष्मीकांत पार्सेकर उपस्थित राहणार आहेत. हा महोत्सव सर्वांसाठी खुला असून लोकांनी मोठ्या संख्येने या महोत्सवात सहभागी होत कार्यक्रमाचा आनंद घ्यावा. अशी माहिती हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळ संचलित गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

# एमसीएल सुपरस्टार्स-पीजीएमएल किंग्ज आमनेसामने

## रमाकांत वेर्लेकर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पाचव्या पर्व २९ रोजी

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. २२ :** सुनिता वेर्लेकर फाऊंडेशनतर्फे रमाकांत वेर्लेकर चॅम्पियन्स ट्रॉफी टी-२० क्रिकेटच्या पाचव्या पर्वाचे आयोजन २९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. डॉ. राजेंद्र प्रसाद मैदान, मडगाव क्रिकेट क्लब येथे एमसीएल सुपरस्टार्स - मडगाव क्रिकेट क्लब मेंबर्स लीग प्रीमियम आणि पीजीएमएल किंग्ज - पणजी जिमखाना मेंबर्स लीग प्रीमियम यांच्यात विद्युतझोतात या करंडकासाठी हा टी-२० सामना रंगणार आहे.

या चॅम्पियन्स ट्रॉफीचे हे पाचवे वर्ष असल्याने भारताचे माजी क्रिकेटपटू, २००७ मध्ये टी-२० विश्वचषक विजेता संघाचा माजी प्रशिक्षक, संयुक्त अरब अमिरातीचे प्रशिक्षक आणि माजी सलामीवीर फलंदाज आणि मुंबई रणजी संघाचे माजी प्रशिक्षक लालचंद राजपूत हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असतील, अशी माहिती सुनिता वेर्लेकर फाऊंडेशनचे विश्वस्त गौतम वेर्लेकर यांनी दिली.

मडगाव क्रिकेट क्लब आणि पणजी जिमखाना क्रिकेट क्लब या राज्यातील दोन आघाडीच्या क्लबांमधील हा सामना मौल्यवान असल्याचे वेर्लेकर यांनी सांगितले. या संघांमध्ये आपापल्या सदस्य लीगमधील सर्वोत्कृष्ट खेळाडूंचा समावेश असेल, असे सांगून मनोज काकुलो आणि योगेश नाईक यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल त्यांनी आभार मानले.

गोवा राज्यासाठी तयार केलेल्या खेळाडूंच्या बाबतीत या दोन्ही क्लबांना मानाचे आणि महत्त्वाचे स्थान आहे. राज्यातील अव्वल दोन क्लबांना एकत्र आणण्याचा हा छोटासा प्रयत्न असून या क्लबचे सर्वोत्तम खेळाडू टी-२० सामन्यात एकमेकांशी भिडतात पाहण्याची संधी मिळणार आहे. यंदा दोन्ही क्लबांनी आपापले संघ निवडले असून हा सामना रोमांचक असेल, अशी आम्हाला आशा आहे.

सुनीता वेर्लेकर फाऊंडेशनचे मुख्य विश्वस्त किशोर कोडोलीकर म्हणाले की, दरवर्षी हा कार्यक्रम सादर करण्याचा फाउंडेशनचा प्रयत्न आहे.

गौतमचे वडील रमाकांत वेर्लेकर हे व्यवसायाने सीए होते आणि क्रिकेटचे मोठे शौकीन होते. १९७० च्या दशकात ते तिंबलो क्रिकेट संघाचे खेळाडू होते. त्यांचा वारसा पुढे नेण्यासाठी दरवर्षी ही ट्रॉफी आयोजित करावी, यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो.

पणजी जिमखान्याच्या संचालन परिषदेचे अध्यक्ष सुरेश महादेवन म्हणाले, 'गोव्यातील क्रिकेटमध्ये हे दोन्ही क्लब आघाडीवर आहेत. राज्यातील सर्वोत्तम खेळाडूंना एकमेकांशी स्पर्धा करण्याची ही आणखी एक संधी आहे.

मडगाव क्रिकेट क्लबचे सचिव अपूर्व भेंब्रे म्हणाले, गोव्यातील या दोन्ही क्लबची स्वतःची मैदाने, पायाभूत सुविधा, संस्था आणि सदस्यसंख्या आहे. ते त्यांच्या सदस्यांच्या लीगदेखील आयोजित करतात. दोन्ही संघांमध्ये क्लबची सदस्यसंख्या मोठी असल्याने एकत्र येणाऱ्या खेळाडूंसाठी ही संधी आहे, त्यामुळे हा मडगाव क्रिकेट क्लब विरुद्ध पणजी जिमखाना नाही. ही प्रतिभा आणि क्षमतांची स्पर्धा आहे. स्पर्धात्मक स्पर्धा पाहायला मिळेल, अशी आम्हाला आशा आहे.

वेर्लेकर म्हणाले की, फ्लडलाईट मॅचचे कारण उष्ण हवामान आहे. या सामन्यात रोलिंग रिप्लेसमेंट, चॅलेंज ओव्हर आणि फलंदाजांच्या धावांबाबतचे निर्बंध यासारखे काही अतिरिक्त बदल असतील, असेही ते म्हणाले.

नियमांमध्ये दोन जोडण्या आहेत - संघांना सामन्यादरम्यान ३ खेळाडूंची बदली करण्याची परवानगी आहे. आणि दुसरे म्हणजे ११ व्या ते १५ व्या षटकादरम्यान एक चॅलेंज ओव्हर असेल ज्यामध्ये फलंदाजी करणाऱ्या संघाला आधी जाहीर केलेल्या टार्गेट रननुसार दुप्पट धावा करण्याची संधी असेल.

पीजीएमएल विजेत्या संघाचा कर्णधार मुख्तार काद्री यावेळी म्हणाला की, फ्लडलाइटखाली एमसीसी मैदानावर खेळण्यासाठी संघ उत्सुक आहे. एमसीएल स्टार्सचा कॅप्टन आदित्य आंगले म्हणाला, मी चार आवृत्त्या खेळलो आहे आणि ही एक शानदार वाटचाल असेल ज्यात सर्वोत्तम प्रतिभा असेल.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 200 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act).